स्थायी समितीच्या **मंगवार दिनांक 24–05–2016** रोजी **सकाळी 11–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 4. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 5. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| 6. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |
| 7. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| 8. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |
| 9. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| 10. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 11. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 12. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 13. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| 14. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 2. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |
| 3. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 151:– प्रभाग क्र. 06 जरीपटका मधील रोमन कॅथलिक कब्रस्तान येथे फुटपाथ रोड व शौचालयाचे बांधकाम करण्यास्तव रु. 49,92,198/–च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 152:–</u> मौझा–वाठोडा येथिल ख.क्र. १५९ व १६० मधील ५.०० हे.आर. खुली जमिन नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. चे कास्टिंग यार्डसाठी वर्ष २०१६–१७ करीता रु. २८,६०,०००/– प्रती महिना दराने अस्थायी भाडेतत्वावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (c) व (d) अन्वये देण्यास व रकमेचे समायोजन हे नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पामध्ये नागपूर महानगरपालिकेला करावयाचे ५% वित्तीय सहभागात करण्यात येईल या व खालील नमुद अटी अधिन राहून मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते, अंतिम मंजुरीकरिता म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येते.

<u>अटी व शर्ती :–</u>

१. मौझा–वाठोडा येथिल ख.क्र. १५९ व १६० मधील ५.०० हे.आर. खुली जमिन मेट्रो रेल्वेचे कास्टिंग यार्डसाठी ४ वर्षाचे कालावधीकरीता अस्थायी भाडेपट्टयावर देण्यात येईल.

२ या जमिनीचे मासिक भाडे वर्ष २०१६–१७ करीता रु. २८,६०,०००/– महानगरपालिकेकडे नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड मार्फत दर महिण्याचे ५ तारखेपर्यंत अग्रिम जमा करावे लागेल.

३ या जमिनीचे मासिक भाडे दर वर्षी त्या त्या वर्षाचे शिघ्रसिध्द गणक दरानुसार निश्चित करून आकारण्यात येईल.

४ नागपूर महानगरपालिकेस सदर जागेची आवश्यकता भासल्यास ३० दिवसाचे पुर्व सुचनेसह सदरील जागा परत घेण्यात येईल.

५ या जमिनीवरील कोणत्याही अस्थायी बांधकामास नागपूर शहराकरीता मंजूर विकास नियमावलीच्या तथा म.प्रा.व न.र.अधि. १९६६ च्या तरतूदी लागू राहतील.

६ सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात यावी.

७ सदर जागेचा उपयोग फक्त कास्टिंग यार्डसाठीच करावा.

८ विद्युत व्यवस्था पाणी व इतर व्यवस्थेची जबाबदारी नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड ची राहिल.

९ उपरोक्त बाबतीत कोणत्याही निर्णयासंबंधिचा संपुर्ण अधिकार मा. आयुक्त, मनपा, नागपूर यांचेकडे सुरक्षित राहील व धारकास बंधनकारक राहील.

<u>ठराव क्रमांक 153:–</u> मौझा–भामटी येथिल ऑरेंज सिटी स्ट्रिट स्किम, सेक्टर–७ मधील ३.८८ हे.आर. खुली जमिन नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. चे कास्टिंग यार्डसाठी वर्ष २०१६–१७ करीता रु. ४७,५३,३२०/– प्रती महिना दराने अस्थायी भाडेतत्वावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (c) व (d) अन्वये देण्यास व या रकमेचे समायोजन हे नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पामध्ये नागपूर महानगरपालिकेला करावयाचे ५% वित्तीय सहभागात करण्यात येईल या व खालील नमुद अटी अधिन राहून मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते, अंतिम मंजुरीकरिता म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येते.

<u>अटी व शर्ती :–</u>

१ मौझा–भामटी येथील ऑरेंज सिटी स्ट्रिट स्किम प्रकल्पातील ३.८८ हे.आर. खुली जमिन मेट्रो रेल्वेचे कास्टिंग यार्डसाठी ४ वर्षाचे कालावधीकरीता अस्थायी भाडेपट्टयावर देण्यात येईल.

२ या जमिनीचे मासिक भाडे वर्ष २०१६–१७ करीता रु. ४७, ५३, ३२०/– महानगरपालिकेकडे नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड नी दर महिण्याचे ५ तारखेपर्यंत अग्रिम जमा करावे लागेल.

३ या जमिनीचे मासिक भाडे दर वर्षी त्या त्या वर्षाचे शिघ्रसिध्द गणक दरानुसार निश्चित करून आकारण्यात येईल.

४ नागपूर महानगरपालिकेस सदर जागेची आवश्यकता भासल्यास ३० दिवसाचे पुर्व सुचनेसह सदरील जागा परत घेण्यात येईल.

५ या जमिनीवरील कोणत्याही अस्थायी बांधकामास नागपूर शहराकरीता मंजूर विकास नियमावलीच्या तथा म.प्रा.व न.र.अधि. १९६६ च्या तरतूदी लागू राहतील.

६ सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात यावी.

७ सदर जागेचा उपयोग फक्त कास्टिंग यार्डसाठीच करावा.

८ विद्युत व्यवस्था पाणी व इतर व्यवस्थेची जबाबदारी नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड ची राहिल.

९ उपरोक्त बाबतीत कोणत्याही निर्णयासंबंधिचा संपुर्ण अधिकार मा. आयुक्त, मनपा, नागपूर यांचेकडे सुरक्षित राहील व धारकास बंधनकारक राहील.

<u>ठराव क्रमांक 154</u>:— नागपूर मनपाच्या शाळेतील वर्ग 9 ते 12 पर्यंतच्या एकूण 7292 विद्यार्थ्यांच्या 02 जोडी गणवेषाकरिता गणवेष कापड खरेदी व शिलाई करावयाची आहे. यापूर्वी हि खरेदी शासन निर्णय दि. 02.01.1992 नुसार गणवेष कापड खरेदी करिता आरक्षित ठेवण्यात आलेल्या, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. नागपूर तथा महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. मुंबई. यांचेकडून करण्यात येत होती. (निविदा प्रक्रिया न करता) परंतु शासन निर्णय दि. 30 ऑक्टोबर 2015 नुसार उपरोक्त खरेदीचे आरक्षण बंद करण्यात आल्याने ही खरेदी ई—निविदा प्रक्रियेने करावी लागणार आहे. याकरिता निविदेमध्ये प्रती मिटर कापडाचे व शिलाईचे दर मागविण्यात येतील.

इयत्ता 9 ते 12 च्या एकूण 7292 विद्यार्थ्यांच्या 02 जोडी गणवेषाकरीता खालीलप्रमाणे कापडांची आवश्यकता राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | शर्ट व कुर्तीकरिता | White with Grey Checks– Shirting | – एकुण 31000 मिटर |
| 2) | फुलपॅन्ट करिता | Darck Grey Colour– Suiting | – एकुण 8600 मिटर |
| 3) | सलवार करिता | Dark Grey Colour – Raymond Cotton | – एकुण 20700 मिटर |
| 4) | ओढणी करिता | Dark Grey Colour – Nylon | – एकुण 16700 मिटर |

वरीलप्रमाणे गणवेश कापड खरेदी व शिलाईकरीता अंदाजित रू.55 लक्ष (अक्षरी पंचावन्न लक्ष) खर्च अपेक्षित आहे.

शैक्षणिक सत्र 2016—17 ची सुरवात 26 जून 2016 रोजी पासून होत असून अल्प कालावधी असल्याने लघू ई—निविदा प्रकाशित करण्यात येईल.

गणवेष कापड खरेदी व शिलाई करिता स्वतंत्र दर मागविण्याकरिता 07 दिवसाची लघू ई—निविदा मागविण्याकरिता तसेच याकरिता येणाऱ्या एकूण अंदाजे रू. 55/— लक्ष खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

प्रस्तावित करण्यात आलेला अपेक्षित खर्च पद क्र. A25002020705 (शालेय विद्यार्थ्यांना गणवेष) तथा पद क्र. A27402020702 (मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गणवेष पुरविणे) या लेखा शिर्ष अंतर्गत होईल.

<u>ठराव क्रमांक 155</u>:— प्रभाग क्र. ४२ ब किल्ला येथे शिवाजीनगर गेट ते गणपती मंदीरपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या **रू.** ४४,९९,२४७/— रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ६७९ व नविन पद क्र. A४२००१४७०५११ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 156</u>:— गांधीसागर पुनरुर्जीवन प्रकल्प, राज्य शासनाचे राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत राबविण्यात येत असून, राज्य शासनाचे पर्यावरण विभागाचे दिशानिर्देश अन्वये गांधीसागर मध्ये मूर्ती विसर्जन टँक उभारण्याकरीता मागविण्यात आलेल्या रितसर निविदा पैकी पाचव्या फेरीमध्ये प्राप्त एकमेव निविदा, मेसर्स तिरुपती कंस्ट्रक्शन कंपनी—गोंदिया, कॅम्प कार्यालय—नागपूर द्वारा मान्य रु. 9582301.00 ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 157</u>:— स्थायी समिती ठराव क्रं.११३ दि ०८/०७/२०१५ अन्वये मृत देहांना अग्नी देण्याकरीता प्रति शवा प्रमाणे लाकडांचा पूरवठा करण्यास दोन वर्षाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता एकुण प्राप्त झालेल्या चार पात्र निविदा पैकी दोन निविदाकार (१) में.भुपेश निलकंठराव चामट, (२) जनता सॉ मिल कामठी यांचे एक सारखे दर प्राप्त झाले असुन वाटाघाटी नंतर प्रति दहन / शव लाकडाचा पुरवठा करण्यासाठी रु. २२११/—दर निश्चित करण्यात आले असुन मनपाच्या सर्व दहन घाटावर वार्षीक अंदाजीत १५००० प्रेतांना प्रति शव दहन रुपये २२११/—प्रमाणे ३,३१,६५०००/— वार्षीक खर्च अपेक्षीत राहील. सध्या महानगरपालिके अंतर्गत एकुण १२ दहन घाट सुरु असुन त्या पैकी ६ दहन घाट में.भुपेश निलकंठराव चामट, व उर्वरीत ६ दहन घाट में जनता सॉ मिल कामठी यांना समान स्वरुपात कांमाचे/दहनघाटाचे वाटप करण्यात येईल. सदर खर्च आय—व्यय पद क्रं.A23501141211 मधुन भागविण्याचा व अधिक प्रावधानाची तरतुद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 158</u>:— प्रभाग क्र. 30 पिवळी मारबत रेल्वे क्रॉसिंग ते पाचपावलेश्वर मंदीरापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 89,98,697/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 159</u>:— प्रभाग क्र. 67— ब राधानंदनगर, आराधना नगर, मंगलदीप नगर व मुद्रानगर येथील रस्त्याचे खडीकरण करणे या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. दिपेश कंन्स्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 36.91 टक्के कमी दराची रू. 25,23,055/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 160</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर